# महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

दूरध्वनी : ०२०-२५५३५४४१ फॅक्स : ०२०-२५५११३०२ ई-मेल : mshmpb_pune@rediffmail.com

जा.क्र. मराफऔवमं/आस्था/१०२१/०७
पुणे. दिनांक : ३० जुन, २००७

## आदेश

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**
**माहिती अधिकारी नेमणूकीबाबत...**

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाची निर्मिती महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. मंडळ २००५/प्रक्र. ४८/९-अे, दिनांक २४ ऑगस्ट, २००५ अन्वये राज्यामध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी झालेली आहे.

ज्या अर्थी, उक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ ही सार्वजनिक संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली स्थापन करण्यात आली असून, उक्त अधिनियमाखाली ती नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा अधिनियम क्र. २२) च्या कलम ३(ज), (घ) अन्वये मंडळ ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या संज्ञेत मोडते.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ५(१) नुसार मंडळाकडे माहिती मिळविण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी, मंडळाच्या अखत्यारीतील सर्व तांत्रिक व प्रशासकीय विभागामध्ये आवश्यक असतील तेवढे माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे आवश्यक आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये मंडळातील नेमणूक करण्यात येणाऱ्या माहिती अधिकाऱ्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास अपिलीय अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडावयाची आहे.

त्या अर्थी, मी श्री. बी. व्ही. गोपाळरेड्डी, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे मंडळातील खालील अधिकाऱ्यांची अनुक्रमे सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

| कार्यक्षेत्र | सहाय्यक माहिती अधिकारी | माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, तंत्र शाखा १ - सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्प आधारित व बँक कर्जाशी निगडीत नसलेल्या घटक योजनांच्या संबंधी कामकाज | तंत्र अधिकारी - १ | प्रकल्प व्यवस्थापक | व्यवस्थापकीय संचालक |

| कार्यक्षेत्र | सहाय्यक माहिती अधिकारी | माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, तंत्र शाखा २ - प्रकल्प आधारित व बँक कर्जाशी निगडीत सर्व घटक योजनांसंबंधी कामकाज | तंत्र अधिकारी - २ | प्रकल्प व्यवस्थापक | व्यवस्थापकीय संचालक |
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक शाखा - नियोजन, अंदाजपत्रक, संनियंत्रण, मासिक प्रगती अहवाल व नियतकालिके संबंधी कामकाज | कृषि अधिकारी (स.प्र.व्य. शाखा) | प्रकल्प व्यवस्थापक | व्यवस्थापकीय संचालक |
| राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाकडील योजना, शाखा तंत्र ३ - राऔव मंडळाकडील योजनांची अंमलबजावणी, संनियंत्रण, मासिक प्रगती अहवाल इ. विषयक कामकाज | तंत्र अधिकारी - ३ | प्रकल्प व्यवस्थापक | व्यवस्थापकीय संचालक |
| लेखा शाखा - वित्त व लेखा विषयक कामकाज | सहाय्यक लेखाधिकारी | विशेष कार्य अधिकारी | व्यवस्थापकीय संचालक |
| आस्थापना शाखा - आस्थापना, आवक-जावक व कार्यालयीन संनियंत्रण विषयक कामकाज | कार्यालयीन अधिक्षक | विशेष कार्य अधिकारी | व्यवस्थापकीय संचालक |
| विशेष प्रकल्प शाखा - संगणकीकरण व मंडळाचे वेबसाईट विषयक कामकाज, त्याचपप्रमाणे मनुष्यबळ विकास विषयक कामकाज | कृषि सहाय्यक (वि.प्र. शाखा) | विशेष कार्य अधिकारी | व्यवस्थापकीय संचालक |
| जनसंपर्क - प्रदर्शने, मंडळाची सभा, बैठका, प्रसिद्धी, इ. विषयक कामकाज | जनसंपर्क अधिकारी | विशेष कार्य अधिकारी | व्यवस्थापकीय संचालक |

पदनिर्देशित केलेल्या सहाय्यक माहिती अधिकारी अथवा माहिती अधिकारी ही पदे काही कारणास्तव रिक्त असल्यास त्या त्या वेळी पदभार देण्यात आलेले अन्य अधिकारी अथवा अशा पद्धतीने पदभार न दिल्यास नजिकचे कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी हे सहाय्यक माहिती अधिकारी/माहिती अधिकारी म्हणून जबाबदाऱ्या पार पाडतील.

**(बी. व्ही. गोपाळरेड्डी)**
व्यवस्थापकीय संचालक
मराफऔवमं, पुणे

प्रत : मा. अध्यक्ष, मराफऔवमं तथा प्रधान सचिव (कृषि व फलो.) यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : अनुपालनास्तव
१) प्रकल्प व्यवस्थापक, मराफऔवमं, पुणे
२) विशेष कार्य अधिकारी, मराफऔवमं, पुणे
३) संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी, मराफऔवम, पुणे

# महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

दूरध्वनी : ०२०-२५५३५४४१ फॅक्स : ०२०-२५५११३०२ ई-मेल : mshmpb_pune@rediffmail.com


जा.क्र. मराफऔवमं/आस्था/३३०४/०७
पुणे. दिनांक : २६ डिसेंबर, २००७

## आदेश

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**
**माहिती अधिकारी नेमणूकीबाबत...**

संदर्भ : मंडळाकडील आदेश क्र. मराफऔवमं/आस्था/१०२१/०७, दिनांक ३० जुन, २००७

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाकडील कामकाजाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जनतेस सुलभरितीने मिळण्यासाठी संदर्भिय आदेशान्वये सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

ज्या अर्थी मंडळाकडे डाळींबावरील तेलकट डाग रोगाच्या निर्मूलनासाठी आदर्श व्यवस्थापन पद्धती राबविणेकरीता विशेष अर्थसहाय्याची योजना राबविण्यात येत असून, यासाठी प्रकल्प समन्वयक हे पद नव्याने निर्माण करण्यात आलेले आहे. उपरोक्त कामाबरोबर त्यांचेकडे अन्य अधिकाऱ्यांकडे असलेली काही कामे सोपविण्यात आलेली आहेत.

त्या अर्थी, मंडळाकडे उपरोक्त नव्याने झालेल्या विभागातील माहिती लोकांना मिळण्यासाठी माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ चे कलम ५(१) नुसार मी बी. व्ही. गोपाळरेड्डी, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे उपरोक्त संदर्भिय आदेशामध्ये अंशतः बदल करुन खालीलप्रमाणे अतिरिक्त सहाय्यक माहिती अधिकारी व माहिती अधिकारी यांची नियुक्ती करीत आहे.

| कार्यक्षेत्र | सहाय्यक माहिती अधिकारी | माहिती अधिकारी | अपिलीय अधिकरी |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (बीबीडी) तंत्र शाखा १ - डाळींबावरील तेलकट डाग रोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत आदर्श व्यवस्थापन पद्धती पॅकेजची अंमलबजावणी, संनियंत्रण विषयक सर्व कामकाज | तंत्र अधिकारी - १ (बीबीडी) | प्रकल्प समन्वयक | व्यवस्थापकीय संचालक |
| राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (बीबीडी) तंत्र शाखा २ - डाळींबावरील तेलकट डाग रोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत आदर्श व्यवस्थापन पद्धती पॅकेजची अंमलबजावणीची प्रसिद्धी व प्रचार, लोकसहभाग वाढविणे इ. विषयक कामकाज.<br>तसेच विशेष प्रकल्प शाखांतर्गत मनुष्यबळ विकास विषयक कामकाज या शाखेकडे वर्ग करुन त्या विषयक सर्व कामकाज. | तंत्र अधिकारी - २ (बीबीडी) | प्रकल्प समन्वयक | व्यवस्थापकीय संचालक |

पदनिर्देशित केलेल्या सहाय्यक माहिती अधिकारी अथवा माहिती अधिकारी ही पदे काही कारणास्तव रिक्त असल्यास त्या त्या वेळी पदभार देण्यात आलेले अन्य अधिकारी अथवा अशा पद्धतीने पदभार न दिल्यास नजिकचे कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी हे सहाय्यक माहिती अधिकारी/माहिती अधिकारी म्हणून जबाबदाऱ्या पार पाडतील.

**(बी. व्ही. गोपाळरेड्डी)**
व्यवस्थापकीय संचालक
मराफऔवमं, पुणे

प्रत : मा. अध्यक्ष, मराफऔवमं तथा प्रधान सचिव (कृषि व फलो.) यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : माहिती व अनुपालनास्तव
१) प्रकल्प व्यवस्थापक, मराफऔवमं, पुणे
२) प्रकल्प समन्वयक, मराफऔवमं, पुणे
३) विशेष कार्य अधिकारी, मराफऔवमं, पुणे
४) संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी, मराफऔवम, पुणे